# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 18 January 2025**

**Time 7.10 AM to 7.20 AM**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १८ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

* स्वामित्व योजनेअंतर्गत ई प्रॉपर्टी कार्ड वितरणाला आज पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ
* राज्य सरकारचं कृत्रीम बुद्धिमत्ता धोरण तयार करण्यासाठी कृती दलाची स्थापना
* बीड प्रकरणी कोणत्याही दोषी व्यक्तीला सोडलं जाणार नाही–मुख्यमंत्र्यांची ग्वाही
* एसटी महामंडळाचा दरवर्षी पाच हजार साध्या लालपरी बस खरेदीचा निर्णय

आणि

* राष्ट्रीय खेल पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान

****

स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्काविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्ड वितरणाला आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ होणार आहे. या कार्यक्रमात देशभरातल्या दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतल्या ६५ लाख ई प्रॉपर्टी कार्डस् पंतप्रधानांच्या हस्ते वितरित करण्यात येणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात तसंच प्रत्येक तालुका मुख्यालयात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम पाहण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. नागरिकांनी या कार्यक्रमात हजर राहण्याचं आवाहन इतर मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केलं आहे.

**

वाहन उद्योगात हरित तंत्रज्ञानाच्या संशोधनावर आपल्या सरकारचा अधिक भर असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधानांनी केलं आहे. काल नवी दिल्लीत भारत मंडपम इथं भारत ग्लोबल मोबिलिटी एक्स्पोच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. जीवाश्म

इंधनावरचा भार कमी करण्यासाठी हरित ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनं यावर भर देत असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं, ते म्हणाले...

> ***''आज हम एक ऐसे मोबिलिटी सिस्टीम के निर्माण में जुटे है, जो इकॉनॉमि और इकोलॉजी दोनों को सपोर्ट करें। एक ऐसा सिस्टीम जो फॉसिल फ्युअल के हमारे इंपोर्ट बिल को कम करें। इसलिये आज ग्रीन टेक्नॉलॉजीज्, ईव्हीज्, हायड्रोजन फ्युअल्स, बायोफ्युअल्स ऐसी टेक्नॉलॉजी के डेव्हलपमेंटपर हमारा काफी फोकस है।''***

****

राज्य सरकारनं आर्टिफिशियल इंटिलिजन्स – अर्थात कृत्रीम बुद्धिमत्ता धोरण तयार करण्यासाठी कृती दलाची स्थापना केली आहे. राज्याचे माहिती तंत्रज्ञान संचालक या कृती दलाचे अध्यक्ष असून, विविध क्षेत्रातल्या १६ तज्ज्ञांचा या कृती दलात समावेश आहे. या कृती दलाला आपल्या शिफारसी सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. ए आय धोरण ठरवणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे.

राज्यात सायबर सुरक्षा धोरण कार्यदलाची स्थापनाही काल करण्यात आली. या कार्यदलाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या आयटी आणि डिजिटल पायाभूत सुविधांची सुरक्षा आणि संरक्षण करण्यात येणार आहे.

****

बीड प्रकरणात कोणत्याही दोषी व्यक्तीला सोडलं जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते काल नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. तपास यंत्रणांना कोणत्याही दबावाशिवाय तपास करू देण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. ते म्हणाले...

> ***''तपासामध्ये अनेक गोष्टी गोपनीय ठेवूनच त्याचा तपास केला जातो. आपण कुठल्याही प्रकारे तपास यंत्रणांवर दबाव न आणता त्यांना काम करू दिलं पाहिजे. मी एवढं निश्चितपणे आश्वस्त करतो की, कुठल्याही परिस्थितीमध्ये कुठल्याही दोषी व्यक्तीला सोडलं जाणार नाही. तपास यंत्रणा योग्य प्रकारे काम करतील.''***

****

पुणे–नाशिक महामार्गावर काल झालेल्या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्र्यांनी पाच लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. काल सकाळी

झालेल्या या अपघातात चार महिला, चार पुरुष आणि ५ वर्षाच्या एका बालिकेचा मृत्यू झाला.

****

राज्य परिवहन महामंडळ–एसटीने दरवर्षी पाच हजार साध्या लालपरी बस खरेदीचा निर्णय घेतला आहे. यासाठी महामंडळांतर्गत पंचवार्षिक नियोजन करण्यात येणार असल्याचं, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. ते काल महामंडळाच्या कामकाज आढावा बैठकीत बोलत होते. यापुढे कुठल्याही पद्धतीने भाडेतत्त्वावर बस न घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

****

चालू आर्थिक वर्षात १५ फेब्रुवारी नंतर औषध वगळता इतर कुठल्याही खरेदीला मान्यता देऊ नये, असे आदेश राज्य सरकारच्या वित्त विभागानं सरकारी कार्यालयांना दिले आहेत. आर्थिक वर्षाच्या शेवटी मंजूर निधी संपवण्यासाठी होत असलेल्या खरेदीला आळा घालण्यासाठी हे परिपत्रक जारी करण्यात आलं आहे.

****

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या ३१ जानेवारीपासून सुरू होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने अधिवेशनाला प्रारंभ होईल, त्यानंतर आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर होईल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन एक फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर करतील. अधिवेशनाचं पहिलं सत्र १३ फेब्रुवारीपर्यंत चालेल, तर १० मार्च ते ४ एप्रिलदरम्यान दुसरं सत्र होणार आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११८ वा भाग असेल. या महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्रजासत्ताक दिन असल्यामुळे या महिन्यात हा कार्यक्रम उद्या होत आहे.

****

राष्ट्रीय खेल पुरस्कार काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात बुद्धिबळाचा जगज्जेता डी गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग, पॅरा अॅथलीट प्रवीण कुमार, आणि नेमबाज मनु भाकर यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. क्रीडा प्रशिक्षकांना देण्यात येणारा द्रोणाचार्य पुरस्कार नेमबाजी प्रशिक्षक

दीपाली देशपांडे यांच्यासह ५ जणांना प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रातला नेमबाज स्वप्नील कुसाळे आणि पॅरा अथलीट सचिन खिलारी यांच्यासह ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आलं. ज्येष्ठ खेळाडू सुचा सिंग आणि दिव्यांग जलतरणपटू मुरलीकांत पेटकर यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार देण्यात आला.

***''श्री मुरलीकांत राजाराम पेटकर। देश के सबसे उत्कृष्ट पॅरा तैराकी खिलाडियों मे से एक है। उन्होंने 1972 में पॅरालंपिक्स मे स्वर्ण पदक, 1970 मे राष्ट्रमंडल पॅराफेजिक खेलों मे स्वर्ण पदक हासिल किया। श्री मुरलीकांत राजाराम पेटकर को पॅरा तैराकी खेल में उनकी उत्कृष्ट उपलब्धियों को मान्यता प्रदान करते हुये, वर्ष 2024 के लिये जीवन पर्यंत अर्जून पुरस्कार प्रदान किया जाता है।''***

महाराष्ट्रातले ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना देखील काल राष्ट्रपतींच्या हस्ते साहसी क्रीडा क्षेत्रातील कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार २०२३ प्रदान करण्यात आला.

****

खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघांनी उपान्त्यफेरीत प्रवेश केला आहे. काल उपांत्यपूर्व फेरीत, भारतीय महिला संघानं बांग्लादेशचा १०९ विरुद्ध १६ गुणांनी तर भारतीय पुरुष संघानं श्रीलंकेचा १०० विरुद्ध ४० गुणांनी पराभव करत उपान्त्य फेरी गाठली.

****

राज्यस्तरीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेत धाराशिव तालुक्यात वडगांव सिद्धेश्वर जिल्हा परिषद प्रशालेच्या संघानं सुवर्णपदक पटकावलं आहे. कोल्हापूर इथं झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत अंतिम सामन्यात अमरावती संघाला पराभूत करून वडगाव जिल्हा परिषद प्रशालेच्या संघानं सुवर्णपदक मिळवलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शार्ङ्गदेव महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. एमजीएम परिसरातल्या महागामी संस्थेत आयोजित या महोत्सवात काल पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात ज्योती हेगडे यांनी रुद्र वीणा वादन तसंच मालवणच्या सिद्धिविनायक दशावतार नाट्य मंडळाने दशावतार प्रयोगाबाबत माहिती दिली, तर सायंकाळी या कलेचं सादरीकरण झालं. बंगळुरूच्या डॉ करूणा विजयेंद्र आणि

संचाने सादर केलेल्या, बदामीतल्या नटेश्वर शिल्पावर आधारित महानट या नृत्याविष्काराला रसिकांची भरभरून दाद मिळाली. महोत्सवाचं हे सोळावं वर्ष आहे.

****

नद्या अतिक्रमणमुक्त करण्यासाठी त्यांच्या सीमा लक्षात घेऊन आरेखन करण्याची आवश्यकता जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह राणा यांनी व्यक्त केली आहे. ते काल हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या एकदिवसीय जल परिषदेत बोलत होते. नद्यांचं वाहून जाणारं पाणी अडवल्यास, पूर आणि दुष्काळ दोन्हीपासून मुक्त होणं शक्य असल्याचं, राणा यांनी नमूद केलं.

****

बीड जिल्ह्यात काल तीन भावांवर जीवघेणा हल्ला झाला, यात दोघांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. आष्टी तालुक्यातल्या वाहिरा परिसरात ही घटना घडली. पोलिसांनी या प्रकरणी संशयित चार जणांना ताब्यात घेतल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

सकल मराठा समाजाचा नांदेड इथला आजचा नियोजित आक्रोश मोर्चा स्थगित करण्यात आला आहे. मराठा आंदोलक श्याम पाटील वडजे यांनी काल पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी शासनाने आरोपींविरोधात मकोका लागू केल्यानं, हा मोर्चा तूर्तास स्थगित करण्यात आल्याचं वडजे यांनी सांगितलं.

****

पर्यटन, उद्योग आणि शाश्वत सिंचनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करण्यासाठी कालबद्ध कृती कार्यक्रम आखला असल्याचं आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी म्हटलं आहे. ते काल धाराशिव जिल्ह्याच्या तुळजापूर तालुक्यात किलज इथं बोलत होते. पहिल्या टप्प्यात १० हजार रोजगारनिर्मिती करण्याचा आपला निश्चय असल्याचं आमदार पाटील यावेळी म्हणाले.

****

महारेशीम अभियानाच्या प्रचारासाठी काल छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल प्रचार रथालं हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. जिल्ह्यात

१०० गावांमध्ये हा रथ, रेशीम उत्पादनाविषयी जनजागृती करणार आहे. जिल्ह्यात पुढच्या वर्षासाठी ११०० एकर क्षेत्रावर तुती लागवडीचं उद्दिष्ट देण्यात आलं आहे.

****